(६) (a) मा. उच्च न्यायालयाचे नागपूर खंडपीठ (b) सन २०१३ ची याचिका क्रमांक ३०९४ (b) निर्णयाचा दिनांक २७ जून २०१३ (c) सन २०१३ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ १०९ वर प्रकाशित.

(७) (a) मा. उच्च न्यायालयाचे नागपूर खंडपीठ (b) सन २०१३ ची याचिका क्रमांक १०२१ (b) निर्णयाचा दिनांक २ ऑगस्ट २०१३ (c) सन २०१३ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ११७ वर प्रकाशित.

(८) (a) मा. उच्च न्यायालयाचे नागपूर खंडपीठ (b) सन २०१२ ची याचिका क्रमांक ६२५६ (b) निर्णयाचा दिनांक १९ ऑक्टोबर २०१३ (c) सन २०१४ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ११ वर प्रकाशित.

(९) (a) मा. उच्च न्यायालयाचे नागपूर खंडपीठ (b) सन २०१२ ची याचिका क्रमांक ६२५७ (b) निर्णयाचा दिनांक १९ ऑक्टोबर २०१३ (c) सन २०१४ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ३६ वर प्रकाशित.

(१०) (a) मा. उच्च न्यायालयाचे नागपूर खंडपीठ (b) सन २०१३ ची याचिका क्रमांक ४५४ (b) निर्णयाचा दिनांक १९ ऑक्टोबर २०१३ (c) सन २०१३ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ २२२ वर प्रकाशित.

**(४)** असे दिसून येते की राज्य शासनाने सर्वोच्च न्यायालयामध्येसुद्धा याबाबतीत विशेष परवानगी अर्ज दाखल करण्याची मुदत निघून गेली असली तरी अपिलासाठी विशेष परवानगी मागणाऱ्या याचिका दाखल करण्याचा सपाटा लावलेला आहे. सन २०११ च्या याचिका क्रमांक २६३३ मध्ये दिनांक १४ ऑक्टोबर २०११ रोजी मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने याबाबतीत जो निर्णय दिला होता तो याच अंकात प्रसृत करण्यात आला आहे. (पृष्ठ ७८ वर) त्या निर्णयाच्या विरोधात राज्य शासनाच्यावतीने याचिका दाखल करण्यासाठी विशेष परवानगी मागणारा अर्ज सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आला होता. तो अर्ज दिनांक ३१ जानेवारी २०१३ रोजी सर्वोच्च न्यायालयात सुनावणीसाठी आला व तो विलंबाने आल्याच्या कारणावरून मा. सर्वोच्च न्यायालयाने डिसमिस केला. "The special leave petition is **DISMISSED** on the ground of delay." हा निर्णय सुद्धा याच अंकात (पृष्ठ ७९ वर) प्रसृत करण्यात आला आहे.

**(५)** संघटनेच्या असे लक्षात आले आहे की राज्य शासनाच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात याच संदर्भात आणखी दोन प्रकरणे दाखल करण्यात आलेली आहेत. **पहिल्या प्रकरणाचा** सर्वोच्च न्यायालयातील Diary No. 1022 of 2014 असा असून ते प्रकरण Special leave petition (Civil 2475 of 2014) म्हणून आता दाखल झालेले आहे. **दुसऱ्या प्रकरणाचा** Diary No. 1023 of 2014 असा आहे. सध्या ते प्रकरण Defective या प्रकारामध्ये आहे. यातील पहिले प्रकरण कोणत्याही वेळी मा. सर्वोच्च न्यायालयात सुनावणीसाठी येवू शकेल. अशा स्थितीमध्ये योग्य वेळी शिक्षकांचे/लाभधारकांचे म्हणणे यथोचितरित्या मांडल्या गेले नाही आणि अशा मांडणीच्या अभावी जर एखाद्या प्रकरणात विपरीत निर्णय झाला तर तो विपरीत निर्णय तत्सम सर्व प्रकरणी लागू करण्याचा शासनातर्फे कसोशीने प्रयत्न केला जाईल. याबाबतीत सर्व लाभधारकांनी जागरूक रहाण्याची आवश्यकता आहे.

- डॉ. प्रवीण रघुवंशी, अध्यक्ष 'नुटा'

*****

ITEM NO.28 Court No.4 SECTION IX

## SUPREME COURT OF INDIA

RECORD OF PROCEEDINGS

Petition(s) for Special Leave to Appeal (Civil)....../2014
CC 1104/2014
(From the judgement and order dated 14/10/2011
in WP No.2633/2011, of The
HIGH COURT OF BOMBAY AT NAGPUR)

STATE OF MAHARASHTRA & ORS Petitioner(s)
***VERSUS***
MANOJ KUMAR & ANR Respondent(s)
WITH I.A. 1 (With appln(s) for c/delay in filing SLP)

**Date: 31/01/2014**
This Petition was called on for hearing today.

**CORAM :**
**HON'BLE DR. JUSTICE B.S. CHAUHAN**
**HON'BLE MR. JUSTICE J. CHELAMESWAR**

For Petitioner(s) Mr. B.H. Marlapalle, Sr. Adv., Ms. Asha G. Nair, Adv., Mr. Aniruddha P. Mayee, Adv.
For Respondent(s)

UPON hearing counsel the Court made the following
**O R D E R**
The special leave petition is
**DISMISSED**
on the ground of delay.

(DEEPAK MANSUKHANI) (M.S. NEGI)
Court Master Assistant Registrar

**AF:P233**

**NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION**

## १४९४० च्या लाभधारक शिक्षकांची सभा

०१.०१.१९९६ नंतर निवडश्रेणीमध्ये गेलेल्या व त्या श्रेणीत पाच वर्षाची सेवा पूर्ण केल्यामुळे पुढे रूपये १४९४० च्या टप्प्यावर वेतननिश्चितीचे लाभधारक असलेल्या नागपूर व अमरावती विभागातील प्राध्यापकांच्या सभेचे आयोजन करण्यात आलेले आहे. बैठकीचा दिवस, दिनांक वेळ व स्थळ खालील तक्त्यात दिल्याप्रमाणे आहे.

| तक्ता |
|---|
| **सभेचे ठिकाण :** शिक्षक भवन, अमरावती विद्यापीठ परिसर, अमरावती |
| **सभेचा दिवस व दिनांक :** रविवार, दिनांक २३ मार्च २०१४ |
| **सभेची वेळ :** दुपारी ४.०० वाजता |

उभय विद्यापीठ क्षेत्रातील सर्व संबंधित प्राध्यापकांनी उपस्थित रहावे अशी विनंती आहे.- **डॉ. अनिल ढगे, सचिव, नुटा**

## बेकायदेशिर 'रिकव्हऱ्या' काढण्याच्या अमरावती सहसंचालकांच्या कार्यालयातील 'उद्योगा'ला मा. उच्च न्यायालयाचे एकामागून एक तडाखे

बेकायदेशीर 'रिकव्हऱ्या' काढण्याच्या बाबतीत उच्च शिक्षण संचालकांच्या अमरावती कार्यालयाचा महाराष्ट्रामध्ये पहिला क्रमांक लागेल असे दिसून येते. अनेक प्रकरणे न्यायालयात दाखल झालेली असून आतापावेतो उच्च न्यायालयाने निरनिराळ्या ४ प्रकरणांत अशा बेकायदेशीर रिकव्हरीला तडाखे हाणलेले आहेत. ते चार निर्णय क्रमशः प्रकाशित करण्यात येत आहेत. ते पुढील प्रमाणे (१) पहिला तडाखा सन २०१३ च्या नुटा बुलेटीनमध्ये पृष्ठ २२२ वर (२) दुसरा तडाखा सन २०१४ च्या नुटा बुलेटीनमध्ये पृष्ठ ११ वर (३) तिसरा तडाखा सन २०१४ च्या नुटा बुलेटीनमध्ये पृष्ठ ३६ वर (४) चौथा तडाखा सन २०१४ च्या नुटा बुलेटीनमध्ये पृष्ठ ८४ वर प्रकाशित करण्यात आलेला आहे.

# अवमान याचिकेची नोटीस दिल्याशिवाय यापूर्वी थकबाकी दिली नाही व तसे केल्याशिवाय उर्वरितांची देणारच नाही हे राज्यशासनाचे धोरण संपूर्णपणे बेकायदेशीरपणाचे व कोडगेपणाचे होय

**प्रा.बी.टी.देशमुख**
*महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष*

मा. मुंबई उच्च न्यायालयामध्ये दिनांक १० मे २०१३ रोजी "that the arrears of salary on the basis of 6th Pay Commission recommendations have partly been paid in March 2013 and that the balance amounts will be released by 31 July 2013" असे शासनाने कबूल केले. **पण उच्च न्यायालयात दिलेला हा शब्द शासनाने पाळला नाही.** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने दिनांक २२ ऑक्टोबर २०१३ रोजी मा. उच्च न्यायालयाच्या अवमान याचिकेची नोटीस दिल्यानंतर मग मात्र उच्च शिक्षण विभागात धावपळ सुरु झाली. उच्च न्यायालयामध्ये कबूल केल्याप्रमाणे मुदतीचे पालन त्यांनी केले नाही. पण ४-५ महिने उशिराने का होईना बहुसंख्य शिक्षकांची सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी अदा करण्यात आली हे खरे असले तरी (१) पार्ट टाईम शिक्षक (२) १ जानेवारी २००६ नंतर नेमणूका झालेले शिक्षक (३) नेट-सेट मुक्त शिक्षक आणि (४) अकारण बेकायदेशीर रिकव्हऱ्या काढण्याच्या नादात पडताळणीच्या नावाखाली अडकून पडलेल्या शेकडो शिक्षकांची थकबाकी अजूनही अदा करण्यात आलेली नाही. उच्च शिक्षण विभागाची ही कृती मा. उच्च न्यायालयाचा निश्चितपणे अवमान करणारी असून त्याबाबत अवमान याचिका का दाखल करण्यात येऊ नये? अशी नोटीस महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने आता पुन्हा ९ फेब्रुवारी २०१४ रोजी बजावली आहे. या साऱ्या घटनाक्रमातून स्पष्ट झालेले उच्च शिक्षण विभागाचे निगरगट्टपणाचे धोरण पुढील लेखातून विशद केलेले आहे.

**२.** या संदर्भातील उच्च शिक्षण विभागाच्या निगरगट्ट वागण्याची सुरुवात ही सन २००९ च्या ऑगस्ट महिन्यापासून होते. शासनाने महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाला दिलेल्या मूळ आश्वासनाची या निमित्ताने आठवण करून देणे आवश्यक वाटते. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे प्रतिनिधी एका बाजूला व दुसऱ्या बाजूला महाराष्ट्राचे मा. मुख्य सचिव, प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांच्यासह मा. मंत्री, (उच्च व तंत्र शिक्षण) श्री. राजेश टोपे यांचे समवेत दिनांक २६ ऑगस्ट, २००९ रोजी झालेल्या बैठकीत जे निर्णय झाले त्या बैठकीच्या इतिवृत्तात पहिलाच परिच्छेद पुढील प्रमाणे आहे. :-

"केंद्र शासनाने पाठविलेल्या विद्यापीठीय व महाविद्यालयातील शिक्षकांच्या वेतन सुधारणा विषयीची समग्र योजना राज्य शासनाने विचारात घेऊन **त्याबाबतचा शासननिर्णय दिनांक १२.८.२००९ रोजी निर्गमित केला.** या योजनेची अंमलबजावणी करतांना केंद्र शासनाकडून ८० टक्के अर्थसहाय्य मिळावे असे उद्दिष्ट राहील. हे अर्थसहाय्य केंद्र शासनाकडून **न मिळाल्यास ८० टक्के थकबाकीची रक्कम राज्य शासन, राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे देईल."** या आश्वासनाची कोणतीही अंमलबजावणी राज्य शासनाने पुढच्या ३ वर्षात केली नाही, ही अत्यंत लाजिरवाणी बाब म्हणावी लागेल.

**३.** राज्याचे मा. उच्च शिक्षण मंत्री, मुख्य सचिव व उच्च शिक्षण सचिव (जे आता मुख्य सचिव आहेत) यांनी लिखित स्वरुपामध्ये दिलेला उपरोक्त शब्द पाळला गेला नाही. हा आता हा उच्च शिक्षण विभागाच्या कोडगेपणाचा लाजिरवाणा इतिहास झालेला आहे. राज्य शासन दिलेला शब्द पाळत नाही म्हणून सन २०१० ते सन २०१३ या काळात वेगवेगळी आंदोलने झालीत. तरीही थकबाकी अदा करण्याच्या संदर्भात अतिशय कोडगेपणाची व निगरगट्टपणाची भूमिकाच राज्य शासनाने घेतली आहे, असे दिसून येते.

**४.** दिनांक ८ मार्च २०१३ रोजी झालेल्या जेल भरो आंदोलनानंतर ७ मार्च २०१३ या तारखेचे एक शासकीय पत्र संघटनेच्या अध्यक्षांना प्राप्त झाले. त्या मध्ये थकबाकी अदा करण्याबाबत पुढील प्रमाणे उल्लेख होता. :- "मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री, मा. मंत्री उच्च व तंत्रशिक्षण तसेच शिक्षक संघटनेच्या प्रतिनिधीसोबत दि. ६.२.२०१३ रोजी झालेल्या बैठकीत थकबाकी पोटी अदा करावयाच्या **अनुषंगाने रु. ५०० कोटीचा पहिला हप्ता मार्च २०१३ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात तरतूद करून वितरित करण्यात येईल असा निर्णय घेण्यात आला आहे."**

**५.** चित्रवाहिन्यांना व वृत्तपत्रांना मुलाखत देतांना दिनांक ६ मार्च २०१३ रोजी मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी "**पाचशे कोटी रुपयाचा पहिला हप्ता मार्च २०१३ अखेर, तेवढाच दुसरा भाग जून २०१३ अखेर व तेवढाच तिसरा भाग जुलै २०१३ अखेरपर्यंत अदा केला जाईल**" असे सांगितले. दुसऱ्या दिवशी मुलाखत देतांना त्यांनी जून व जुलै २०१३ ऐवजी सप्टेंबर व डिसेंबर २०१३ असे सांगितले. मात्र तसा मुदतीबाबतचा कोणताही उल्लेख "**थकबाकी बाबतचा शासनाचा निर्णय**" समाविष्ट असलेल्या ६ फेब्रुवारी २०१३ च्या बैठकीच्या अधिकृत शासकीय कार्यवृत्तामध्ये अजिबात नव्हता हे नमूद करण्यासारखे आहे.

**६.** दिनांक ६ फेब्रुवारी २०१३ रोजी मा. मुख्यमंत्र्यांसमवेत महासंघाच्या पदाधिकाऱ्यांची जी बैठक झाली त्याचे जे एकतर्फी अधिकृत शासकीय कार्यवृत्त संघटनेकडे पाठविण्यात आले आहे त्यामध्ये महाराष्ट्र शासनाने ही गोष्ट मान्य केलेली होती की, केंद्र शासनाने "**दिनांक १४.०८.२०१२ च्या पत्रान्वये मात्र वरील ८० टक्के रक्कम प्रथम राज्य शासनाने अदा करावी. त्यानंतर सदर रक्कमेची प्रतिपूर्ती २ ते ३ हप्त्यामध्ये राज्य शासनास करण्यात येईल असे कळविले आहे.** " याच कार्यवृत्तात पुढे असे नमूद केले होते की, "**तसेच केंद्र शासनाने दि. १४.११.२०१२ च्या पत्रान्वये संबंधित अध्यापकांना केंद्र शासनाच्या ८० टक्के हिश्श्याची रक्कम अदा केल्याचे प्रमाणपत्र सादर करण्यास सांगितले आहे.**" वर प्रमाणे केंद्राच्या योजनेचा गाभा कथन केल्यानंतर केंद्रीय योजनेच्या विरोधात राज्य शासनाने आपली थकबाकी अदा करण्याच्या योजनेची मांडणी केलेली होती. असे करतांना सुरुवात मात्र "**केंद्र शासनाचे वरील धोरण विचारात घेऊन**" आमची योजना आहे असा उल्लेख न चूकता केलेला होता. थकबाकी अदा करण्याची त्या कार्यवृत्तातील राज्य शासनाची योजना शब्दशः पुढील प्रमाणे :-

"**केंद्र शासनाचे वरील धोरण विचारात घेता** सदर रु. १५२६.५० कोटी इतक्या रकमेपैकी रुपये ५००.०० कोटी इतक्या रक्कमेचा पहिला हप्ता मार्च, २०१३ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात तरतूद करून वितरित करण्यात येईल...... तदनंतर सदर रकमेची प्रतिपूर्ती करण्यासाठी केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल व **केंद्र शासनाकडून जेवढ्या रकमेची प्रतिपूर्ती होईल, तेवढी रक्कम राज्य शासनाकडून दुसरा हप्ता देण्यासाठी आगामी अधिवेशनात तरतूद**

**करून सदर रक्कम वितरित करण्यात येईल......** त्याचप्रमाणे राज्य शासनाने अदा केलेल्या दुसऱ्या हप्त्याची प्रतिपूर्ती करण्यासाठी केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल व **केंद्र शासनाकडून जेवढ्या रक्कमेची प्रतिपूर्ती होईल तेवढी रक्कम राज्य शासनाकडून तिसरा हप्ता देण्यासाठी आगामी अधिवेशनात तरतूद करून सदर रक्कम वितरित करण्यात येईल......** वरील पद्धतीने थकबाकीची रू. १५२६.५० कोटी इतकी रक्कम अध्यापकांना अदा करण्यात येईल."

**७.** महासंघाने याबाबतचा अलाहाबाद उच्च न्यायालयाचा निर्णय वारंवार लेखी निवेदनाद्वारे शासनाच्या लक्षात आणून दिला. ८० टक्क्याची ही थकबाकी अदा करण्याबाबत दिनांक १७ जानेवारी २०१३ रोजी W.P. 64068 of 2011 या प्रकरणात अर्जदाराचे, केंद्र शासनाचे व राज्यशासनाचे म्हणणे ऐकून घेतल्यावर अलाहाबाद उच्च न्यायालयाने पुढील प्रमाणे निर्णय दिला होता. :-

"In view of the aforesaid facts, we are of the view that the **stand taken by the State Government in the impugned order is wholly erroneous and cannot be sustained.** The proper course available to the State Government is first to pay the amount pursuant to the recommendations of the UGC, which admittedly has been accepted by the State Government and thereafter shall apply to the Central Government for reimbursement of the amount so incurred towards the payment of arrears of salary..... **For the reasons aforesaid, the impugned order dated 21.8.2011 is liable to be quashed.**" हा निर्णय लक्षात घेऊनच महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने २५ फेब्रुवारी २०१३ रोजीच्या बैठकीत "सदरहू कार्यवृत्तामधे नमूद करण्या त आलेली **राज्यशासनाची थकबाकी अदा करण्याबाबची एकंदर योजना ही केंद्राच्या योजनेच्या विरोधा त र आहेच पण मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्यासुद्धा विरोधा त आहे व यामुळे ती फेटाळून लावण्या त ये त आहे.**" असा ठराव केला होता.

**८.** थकबाकी अदा करण्याच्या बाबतीत तोंडी मा. उच्च शिक्षणमंत्री भरमसाठ विधाने करीत सुटलेले होते. लेखी सुद्धा ते जे कळवित होते त्यामध्ये एकवाक्यता नव्हती व ते लेखी नमूद करीत असलेली एकूण भूमिका ही केंद्र शासनाच्या योजनेच्या व मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या विरोधात होती. शासनाने महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाला दिलेल्या मूळ आश्वासनाच्या विरोधात होती. **राज्यशास-ाची थज्बाज्ी अदा ज्रज्याबाबची एज्ंदर योज-ा ही ज्ेंद्राच्या योज-ेच्या विरोधात तर आहेच पज मा. उच्च -यायालयाच्या -िर्जयाच्यासुद्धा विरोधात आहे व त्यामुळे ती फेटाळू-ा लावज्यात येत आहे.**" असा ठराव महासंघाच्या कार्यकारी मंडळाने यापूर्वीच केलेला होता. "अद्यावत घटनाक्रम लक्षात घेता असे नमूद करण्यात येत आहे की, थकबाकी अदा करण्याबाबत २५ फेब्रुवारी २०१३ रोजी व त्यापूर्वी दिनांक ६ फेब्रुवारी २०१३ रोजीच्या ठरावान्वये (हे दोनही ठराव शासनाला सादर करण्यात आलेले आहेत) या महासंघाने घेतलेल्या भूमिकेमध्ये कोणताही बदल करावा असा कोणताही निर्णय समोर आलेला नाही." असा निर्णय महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने मुंबई येथे ९ मार्च २०१३ रोजी झालेल्या बैठकीत घेतला.

**९.** शेवटी हे सारे प्रकरण उच्च न्यायालयात दि. १० मे २०१३ रोजी निकालात निघाले. त्याच दिवशी मा. उच्च न्यायालयामध्ये कामकाज सुरू होण्यापूर्वी एक शपथपत्र महासंघाच्या वतीने दाखल करुन ही थकबाकी अदा करण्यासंदर्भात महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यवाह श्रीमती ताप्ती मुखोपाध्याय यांनी महासंघाची भूमिका मांडली होती. ती पुढील शब्दात :-

"I say that government's decision in respect of release of arrears is totally contradictory to the Union government directions contained in its letters dated 14th August 2012 and 14th November 2012. I say and submit that MFUCTO in its meetings with the Government had pointed out that the arbitrary decisions of the government was also against the **Judgment and Order dated 17th January 2013 of the Hon'ble Allahabad High Court in W.P. No.64048 of 2011 which had quashed and set aside the UP Government's order to the effect that arrears of sixth pay commission revised scales of pay will be released only after the 80 per cent of additional expenditure was received from the central government.**"

**१०.** शेवटी या संदर्भात दिनांक १० मे २०१३ रोजी मा. उच्च न्यायालयाने सन २०१३ च्या याचिका क्र. (L) 1326 मध्ये जो निर्णय दिला त्यातील परिच्छेद २ पुढील प्रमाणे आहे. :-

"So far as the first demand is concerned, Dr. Mukhopadhyay has given the past events. We do not propose to go into the dates and events referred to in the affidavit but we record the statement being made by Mr. Saluja, learned A.G.P. under instructions of Mr. G. S. Rasal, Joint Secretary to the Government of Maharashtra, Higher Education and Technical Education Department, that the **arrears of salary on the basis of 6th Pay Commission recommendations have partly been paid in March 2013 and that the balance amounts will be released by 31 July 2013.**"

**११.** सहाव्या वेतन आयोगाच्या पोटी अदा करावयाची थकबाकी ३१ जुलै २०१३ पूर्वी संपूर्णपणे अदा केली जाईल हा न्यायालयात दिलेला शब्द उच्च शिक्षण विभागाने पाळला नाही. २२ ऑक्टोबर २०१३ रोजी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने प्रधान सचिव उच्च शिक्षण यांना अवमान याचिका कां दाखल करू नये अशी विचारणा करणारी वकिलामार्फत नोटीस दिली. या नोटीसमध्ये पुढील प्रमाणे नमूद करण्यात आले होते.

"**My client states that the undertaking of releasing the arrears in full by 31st July 2013 has not been fulfilled even though more than 2 months and three weeks have expired since the cut-off date of 31-7-2013.** The said act appears to be deliberate and amounts to showing scant respect for the orders of the Hon'ble High Court at Bombay based on assurances given to the Hon'ble Court which led to the University and College teachers withdrawing their 96-day old agitation of non-cooperation in University-related examinations in the State. **The failure to act consistent with the assurance given to the Hon'ble Court amounts to contempt of the Hon'ble Court..... My client will also be compelled to take out contempt proceedings against you as representative of the State in the Hon'ble High Court at Bombay.** My client would wish to avoid such a contingency but it will entirely depend on the action of the State."

**१२.** अवमान याचिकेची ही नोटीस मिळाल्यानंतर उच्च शिक्षण विभागामध्ये जोरात धावपळ सुरु झाली व पुढच्या दोन तीन महिन्यामध्ये ही थकबाकी बहुतेक शिक्षकांना अदा करण्यात आली असली तरी ४ प्रमुख प्रवर्ग सहाव्या वेतन आयोगाच्या थकबाकीपासून अजूनही वंचित ठेवण्यात आले आहेत. शासनाचे हे कृत्य निश्चितपणे न्यायालयाचा अवमान करणारे आहे. "सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी अदा करण्याचे काम एकाही शिक्षकांच्या बाबतीत शिल्लक राहीले नाही" असे प्रतिज्ञापत्रावर नमूद करण्यासाठीच्या कृतिनेच उच्च न्यायालयाच्या अवमानाच्या अपराधातून उच्च शिक्षण विभागाची सुटका होऊ शकते ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. ज्या चार प्रकारच्या शिक्षकांना थकबाकीपासून वंचित ठेवण्यात आलेले आहे, त्याचे तपशील पुढील प्रमाणे :-

**१२.१ पार्ट टाईम प्राध्यापक** :- अनेक वर्षे पार्ट टाईम शिक्षक म्हणून या शिक्षकांनी काम केलेले आहे. सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी अदा करण्याचे जे अभिवचन शासनाने मा. उच्च न्यायालयात दिलेले आहे ते पूर्ण करतांना या पार्टटाईम शिक्षकांना का म्हणून वगळण्यात आलेले आहे याचा कोणताही समाधानकारक खुलासा उच्च शिक्षण विभाग करू शकत नाही व ही थकबाकी अदा केल्याशिवाय न्यायालयाच्या अवमानाच्या अपराधातून उच्च शिक्षण विभागाची सुटका होऊ शकत नाही.

**१२.२ एक जानेवारी २००६ नंतर नेमण्यात आलेले प्राध्यापक** :- जे प्राध्यापक १ जानेवारी २००६ नंतर सेवेत आलेले आहेत त्यांना केंद्र शासनाच्या योजनेप्रमाणे केंद्राकडून कोणतीही मदत मिळणार नाही हे खरे असले तरी त्यांना सहावा वेतन आयोग लागू करण्यात आलेला आहे व त्यांच्या बाबतीतसुद्धा सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी अदा करण्याचे जे अभिवचन शासनाने उच्च न्यायालयात दिलेले आहे, ते पूर्ण करतांना या १ जानेवारी २००६ नंतरच्या शिक्षकांना का म्हणून वगळण्यात आलेले आहे याचा कोणताही समाधानकारक खुलासा उच्च शिक्षण विभाग करू शकत नाही व ही थकबाकी अदा केल्याशिवाय न्यायालयाच्या अवमानाच्या अपराधातून उच्च शिक्षण विभागाची सुटका होऊ शकत नाही.

**१२.३ नेट-सेटमुक्त शिक्षकांबाबत** तर शासनाचे वर्तन अत्यंत बेकायदेशीरपणाचे आहे. हे सर्वच्या सर्व शिक्षक १९९१ ते १९९९ या काळात नेमल्या गेलेले आहेत व बॉटम स्केलमध्ये काहींना थकबाकीसुद्धा देण्यात आलेली आहे, ही गोष्ट खरी असली तरी मा. उच्च न्यायालयाचे अनेक निर्णय झाल्यानंतर व मुख्य म्हणजे सर्वोच्च न्यायालयाचा दिनांक १८ नोव्हेंबर २०१३ रोजीचा 'अंतरीम आदेश' झाल्यानंतर वरिष्ठ श्रेणी व निवडश्रेणीपोटी द्यावी लागणारी थकबाकी ही सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी असून ती अदा न करणे ही न्यायालयाचा अवमान करणारीच कृती होय. सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी अदा करण्याचे जे अभिवचन शासनाने उच्च न्यायालयात दिलेले आहे ते पूर्ण करतांना या सर्व शिक्षकांना सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय झाल्यानंतरही वरिष्ठ व निवडश्रेणीची थकबाकी अदा करण्यातून का म्हणून वगळण्यात आलेले आहे याचा कोणताही समाधानकारक खुलासा उच्च शिक्षण विभाग करू शकत नाही व ही थकबाकी अदा केल्याशिवाय न्यायालयाच्या अवमानाच्या अपराधातून उच्च शिक्षण विभागाची सुटका होऊ शकत नाही.

**१२.३.१** एका बाजूला या नेट-सेट मुक्त शिक्षकांना वरिष्ठश्रेणी व निवडश्रेणी अदा करण्यामुळे येणाऱ्या आर्थिक भाराच्या ८० टक्के मदत (१ जानेवारी २००६ ते ३१ मार्च २०१० या कालखंडासाठी) केंद्र शासनाकडून मिळणार आहे. केंद्र शासनाने ३१ डिसेंबर २००८ च्या त्यांच्या शासननिर्णयामध्ये असलेली ही तपशीलवार योजना राज्य शासनाला कळविली आहे. केंद्र शासनाच्या त्या शासननिर्णयाच्या परिच्छेद 8 (P)(V)(e) मध्ये स्पष्टपणे पुढील प्रमाणे उल्लेख आहे. : "Financial assistance from the Central Government shall be restricted to revision of pay scales in respect of only those posts which were in existence and had been filled up as on 1.01.2006." हे सर्व शिक्षक १ जानेवारी २००६ च्या कितीतरी अगोदर नियुक्त झालेले असल्याने केंद्राचे ८० टक्के अनुदान या शिक्षकांच्या थकबाकी बाबतसुद्धा अनुज्ञेय आहे.

**१२.३.२** केंद्र शासनाने १४ ऑगस्ट २०१२ रोजी सर्व राज्याच्या उच्च शिक्षण सचिवांना एक परिपत्रक ( No. F.1-7/2010 U.II) पाठवून असे कळविले आहे की, : "**State Governments may please note that reimbursement of 80% of central share of the additionality of payment of arrears, for the period from 1.1.2006 to 31.3.2010, will be made by the Central Government in 2-3 installments.** However, this would be by way of reimbursement only, after the State Government has made the payment." प्रथम तुम्ही (राज्यशासनाने) थकबाकी अदा करावी, त्यानंतरच परतावा (reimbursement) मिळेल अशी ही केंद्र शासनाची व्यवस्था आहे.

**१२.३.३** दुसऱ्या बाजूला मा. सर्वोच्च न्यायालयाने "दिनांक १८ नोव्हेंबर २०१३ रोजी राज्य शासनाने दाखल केलेल्या SLP क्रमांक 34118 of 2013 या प्रकरणात पुढील प्रमाणे निर्णय दिला. " We are of the view that following the UGC Notification/Letter dated 4.11.2008, those teachers who have not passed NET/ SET examination but who have completed six years of service as on that date should be entitled to the benefits of career advancement scheme only for the purpose of pay-scales. According to us such an interim order for that limited purpose will meet ends of justice."

**१२.३.४** मा. सर्वोच्च न्यायालयात दिनांक १८ नोव्हेंबर २०१३ रोजी

## १ जानेवारी २००६ नंतर पण २१ ऑगस्ट २००९ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या प्राध्यापकांसाठी : ५

**१३.** एक जानेवारी २००६ नंतर पण २१ ऑगस्ट २००९ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या विद्यापीठीय व महाविद्यालयीन प्राध्यापकांना सेवानिवृत्ती समयी अदा करावयाच्या ग्रॅच्युईटी संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ३० जानेवारी २०१३ रोजी "In the result, the appeal is allowed and the impugned order is set aside. **The cut-off date, i.e. 01.09.2009 specified in G.R.dated 21.08.2009 is declared unconstitutional** " असा निर्णय दिला. (हा निर्णय शब्दशः सन २०१३ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ९३ ते ९५ वर प्रसृत करण्यात आला आहे.)

**१४.** शिवाजी विद्यापीठ शिक्षक (SUTA) संघातर्फे दाखल करण्यात आलेल्या याचिकेमध्ये मुंबई उच्च न्यायालयाच्या मा. खंडपीठाने दिनांक ३ सप्टेंबर २०१३ रोजी "We direct the State Government to take a policy decision on the basis of the order of the Apex Court dated 30th January, 2013, within a period of four weeks from today ;" असा निर्णय दिला (हा निर्णय शब्दशः सन २०१३ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ २१० वर प्रसृत करण्यात आला आहे.) याच प्रकरणात मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार १४ ऑक्टोबर २०१३ रोजी ही याचिका त्याच खंडपीठाच्या बोर्डावर पुन्हा 'डायरेक्शन' या सदराखाली सुनावणीस आली. त्या दिवशी न्यायालयात सरकारी वकिलांनी पुढील प्रमाणे माहिती दिली. :- "Learned AGP on instructions states that the State has applied for review of the Judgment and Order dated 30th January, 2013 passed by the Apex Court on the basis of which this Court has issued directions."

**१५.** आता मा. सर्वोच्च न्यायालयाने राज्य शासनाची ही पुनर्विलोकन याचिका दिनांक १३.१०.२०१२ रोजी पुढील शब्दात खारिज केलेली आहे. "The review petition is accordingly dismissed." त्यादिवशी मा. सर्वोच्च न्यायालयात झालेल्या कार्यवाहीचे तपशील "RECORD OF PROCEEDINGS" तसेच त्यादिवशी मा. सर्वोच्च न्यायालयाने पारित केलेला आदेश "**ORDER**" सोबत प्रसृत करीत आहेत.

**डॉ. प्रवीण रघुवंशी**, अध्यक्ष, ( NUTA ) **डॉ. अनिल ढगे**, सचिव, **प्रा. एम.टी.देशमुख**,संघटक

PR:(1)P93-95NB2013(2)P149NB2013(3)P210NB2013(4)P220NB2013 (5)P83NB2014

# SUPREME COURT OF INDIA

RECORD OF PROCEEDINGS

REVIEW PETITION (C) NO.1659 OF 2013 **IN**
CIVIL APPEAL NO.908 OF 2013

State of Maharashtra and another...Petitioner(s) ***VERSUS***
Association of College and University Superannuated Teachers (Maharashtra) and others ...Respondent(s)

(with appln(s) for c/delay in filing review petition and office report)

**DATE: 23/10/2013**

This Petition was circulated today.

**CORAM :**
**HON'BLE MR. JUSTICE G.S. SINGHVI**
**HON'BLE MR. JUSTICE FAKIR MOHAMED IBRAHIM KALIFULLA**

By Circulation

UPON perusing papers the Court made the following

O R D E R

Delay condoned. The review petition is dismissed.

(Parveen Kr. Chawla) Court Master   (Phoolan Wati Arora) Court Master

**(Signed Order is placed on the file)**

## IN THE SUPREME COURT OF INDIA

CIVIL APPELLATE JURISDICTION : REVIEW PETITION (C) NO.1659 OF 2013 **IN** : CIVIL APPEAL NO.908 OF 2013

State of Maharashtra and another...Petitioner(s) ***VERSUS***
Association of College and University Superannuated Teachers (Maharashtra) and others ...Respondent(s)

## O R D E R

1. Delay condoned.

2. This is a petition for review of order dated 30.01.2013 whereby the appeal filed by respondent no.1 was allowed and cut-off date, i.e., 01.09.2009 specified in G.R. dated 21.08.2009 was declared unconstitutional.

3. We have perused the Review Petition and record of the special leave petition and are convinced that the order of which review has been sought does not suffer from any error apparent warranting its reconsideration.

4. The review petition is accordingly dismissed.

G.S. SINGHVI J.
FAKIR MOHAMED IBRAHIM KALIFULLA.J.

NEW DELHI : OCTOBER 23, 2013.

CHAMBER MATTER   SECTION IX

उपरोक्त निर्णय झाला. त्यापूर्वी मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या निरनिराळ्या सात खंडपीठांनी या शिक्षकांच्या बाजूने निर्णय दिलेले आहेत. ते पुढील प्रमाणे :-

"(१) दिनांक १ ऑगस्ट २०१३ रोजी मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने सन २०१० च्या याचिका क्रमांक ११४७७ मध्ये दिलेला निर्णय. (Circulated on page 114 & 115 of 2013 NUTA Bulletin)

(२) मा. औरंगाबाद खंडपीठाने नेट-सेटमुक्त शिक्षकांच्या बाबतीत दिनांक २८ ऑगस्ट २०१३ रोजी सन २०१३ च्या याचिका क्रमांक ५२७१ मध्ये दिलेला निर्णय. *(Circulated on page 145 to 149 of 2013 NUTA Bulletin)*

(३) मा. औरंगाबाद खंडपीठाने दिनांक १३ सप्टेंबर २०१३ रोजी सन २०१३ च्या याचिका क्रमांक ४९९४ मध्ये दिलेला निर्णय. *(Circulated on page 205 to 206 of 2013 NUTA Bulletin)*

(४) दिनांक १० ऑक्टोबर २०१३ रोजी उच्च न्यायालयाच्या मा. औरंगाबाद खंडपीठाने सन २०१३ च्या याचिका क्रमांक ६६५९ मध्ये दिलेला निर्णय. *(Circulated on page 216 of 2013 NUTA Bulletin)*

*(5)* मा. उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाने दिनांक २६ सप्टेंबर २०१३ रोजी सन २०१३ च्या याचिका क्रमांक ३१२२ मध्ये दिलेला निर्णय. *(Circulated on page 218 of 2013 NUTA Bulletin)*

(६) मा. औरंगाबाद खंडपीठाने नेट-सेटमुक्त शिक्षकांच्या बाबतीत दिनांक १७ ऑक्टोबर २०१३ रोजी सन २०१३ च्या याचिका क्रमांक १०१४९ मध्ये दिलेला निर्णय. *(Circulated on page 234 to 236 of 2013 NUTA Bulletin)*

(७) मा. औरंगाबाद खंडपीठाने नेट-सेटमुक्त शिक्षकांच्या बाबतीत दिनांक २१ नोव्हेंबर २०१३ रोजी सन २०१३ च्या याचिका क्रमांक १०२८३ मध्ये दिलेला निर्णय. *(Circulated on page 17 to 20 of 2014 NUTA Bulletin)"*

**१२.३.५** राज्याचा उच्च शिक्षण विभाग मा. उच्च शिक्षण मंत्र्यांच्या नेतृत्वाखाली काम करतो. त्यांच्या आदेशानुसारच शासन सर्वोच्च न्यायालयात गेले. मा. औरंगाबाद खंडपीठाच्या १ ऑगस्ट २०१३ रोजीच्या सन २०१० च्या याचिका क्रमांक ११४७७ मध्ये निर्णय देतांना मा. सर्वोच्च न्यायालयाने उक्त प्रकरणी धोरणात्मक असा "अंतरिम आदेश" (Interim Order) दिला. त्याची अंमलबजावणी करण्याचे घटनात्मक कर्तव्य मा. उच्च शिक्षणमंत्री पार विसरून गेलेले आहेत.

**१२.३.६** मा. सर्वोच्च न्यायालयाने उपरोक्त आदेश दिल्यानंतर १० दिवसांनी दिनांक २८ नोव्हेंबर २०१३ रोजी मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी एका सन्माननीय विधानमंडळ सदस्यांना त्या बिगर नेट-सेट प्राध्यापकांपैकी ज्यांनी विहीत शैक्षणिक अर्हता प्राप्त केली त्यांच्या बाबतीत "सदर अध्यापकांना नियुक्तीच्या दिनांकापासून त्यांची सेवा काल्पनीकरित्या (Notional) ग्राह्य धरून त्यांना करिअर ॲडव्हान्समेंट स्कीम अंतर्गत लाभ मंजूर करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे." असे लेखी पत्रान्वये कळविले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर असे कळविणे हे न्यायालयाचा अवमान करणारे कृत्य आहे, एवढी माहिती मा. उच्च शिक्षणमंत्र्यांना नक्कीच असणार. तशी ती नसेल तर त्यांना ती माहिती करून देण्याचे काम संघटनांनाच करावे लागेल हेही उघड आहे.

**१२.४ 'रिकव्हऱ्या' व 'पडताळणी'चे 'बेकायदेशीर लचांड'** :- सहाव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीमध्ये शासननिर्णयाने वेतन निश्चितीचे काम विद्यापीठाकडे सोपविले होते. सर्व विद्यापीठांनी एका शिस्तीत शासन निर्णयाप्रमाणे संगणकीय पद्धतीचा शास्त्रीय आधार घेवून सहाव्या वेतन आयोगाची वेतननिश्चिती करून दिली आहे. असे असतांना सहसंचालकांच्या कार्यालयातील 'बाबुं'ना रिकव्हऱ्या काढण्याची जी गोडी अनेक वर्षापासून लागली आहे. त्या गोडीमुळे शेकडो शिक्षकांची थकबाकी अजूनही अदा करण्यात आलेली नाही. **पडताळणीच्या नावाखाली अनेकांची थकबाकी अदा करण्यात आलेली नाही.** वस्तुतः "सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी अदा करणे" हे एक वेगळे काम असून ते न्यायालयात नमूद केलेल्या मुदतीच्या आत होणे आवश्यक आहे. व "खरोखरच चुकीची माहिती देऊन कोणी बेकायदेशीर लाभ मिळविला असेल तर त्यांची रिकव्हरी काढणे" हे एक वेगळे काम आहे व सहसंचालक कार्यालयातील बाबू बाराही महिने ते काम करीतच असतात व पुढच्या बारा महिने त्यांना ते काम सुरू ठेवता येईल. मात्र ही दोन स्वतंत्र कामे आहेत व ती एकमेकात गुंतविता कामा नये. वेतननिश्चितीच्या प्रक्रियेत स्थान नसलेली अशी पडताळणीच्या नावाखाली 'रिकव्हरी'ची वेगळीच प्रक्रिया सुरु करून शेकडो शिक्षकांची थकबाकी आजही अदा करण्यात आलेली नाही. सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी अदा करण्याचे जे अभिवचन शासनाने उच्च न्यायालयात दिलेले आहे ते पूर्ण करतांना या शिक्षकांना का म्हणून वगळण्यात आलेले आहे याचा कोणताही समाधानकारक खुलासा उच्च शिक्षण विभाग करू शकत नाही व ही थकबाकी अदा केल्याशिवाय न्यायालयाच्या अवमानातून उच्च शिक्षण विभागाची सुटका होऊ शकत नाही.

**१३.** शेवटी काय तर राज्य शासनाच्या उच्च शिक्षण विभागाचे सहसचिव श्री.जी.एस. रसाळ यांच्या सूचनेनुसार शासकीय अधिवक्ते श्री. सलुजा यांनी उच्च न्यायालयासमोर काय हमी दिली होती? ती राज्य शासनाने पून्हा काळजीपूर्वक वाचून पहावी. मा. उच्च न्यायालयाच्या १० मे २०१३ च्या निर्णयातील परिच्छेद २ पून्हा काळजीपूर्वक वाचून पहावा. **एक म्हणजे** पार्टटाईम प्राध्यापक, **दुसरे म्हणजे** १ जानेवारी २००६ नंतर नेमल्या गेलेले प्राध्यापक, **तिसरे म्हणजे** वरीष्ठ व निवडश्रेणीतील स्थाननिश्चितीच्या पोटी येणारी थकबाकी न मिळालेले नेट-सेटमुक्त प्राध्यापक व **चौथे म्हणजे** बेकायदेशीर पडताळणीच्या पोटी ज्यांना थकबाकी देण्यात आलेली नाही असे प्राध्यापक या चार प्रवर्गातील प्राध्यापकांना थकबाकी अदा न करण्यामुळे न्यायालयाचा अवमान होतो की नाही? याची उच्च शिक्षण विभागाने खात्री करून घ्यावी व त्याप्रमाणे पुढील कारवाई करावी.

**१४.** अशी कारवाई उच्च शिक्षण विभाग आपणहून करणार नाही असे गृहीत धरूनच आता ९ फेब्रुवारी २०१४ रोजी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या वतीने संघटनेच्या अधिवक्त्यांनी अवमान याचिकेची दुसरी नोटीस प्रधान सचिव उच्च व तंत्रशिक्षण यांना दिलेली आहे. या नोटीसमध्ये स्पष्टपणे असे बजावण्यात आले आहे की,

"My client will also be compelled to bring to the notice of the Ministry of Human Resource Development and the UGC that the Government of Maharashtra has not released the arrears in respect of these categories of teachers and therefore the MHRD and the **UGC should intervene and call upon the Government of Maharashtra to, first of all, release the full arrears in respect of these categories of teachers and then claim 80% of the total expenditure on the sixth pay commission arrears by way of reimbursement.**"

या सर्व शिक्षकांची थकबाकी अदा केल्याशिवाय केंद्र शासनाकडून मिळावयाचे १५०० कोटी रुपये (८० टक्के रक्कम) मिळणार नाही, ही गोष्ट उघड आहे. केंद्र शासनाकडून १५०० कोटी रूपये नाही मिळाले तरी चालेल, पण या शिक्षकांना थकबाकी द्यायचीच नाही असा विचार मंत्रालयातील अधिकारी करतील व मा. उच्च शिक्षणमंत्री त्याला मान डोलवतील असे आजच गृहीत धरणे योग्य ठरणार नाही.

**You are well aware that as per Article 129 and 215 of the Constitution of India, the Hon'ble Supreme Court of India and the Hon'ble High Court are Court of records. Their directions are binding on you and you need to implement them without any consideration at your level being part of Executive.**

*( See para 6 of the Notice Dated 17.02.2014 issued by NUTA to Minister for Higher Education )*

## ALL INDIA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS

### CIRCULAR-2/2013-14 : 10.01.2014

**Dear Friends,**

**Wishing all of you, your colleagues, family & friends a very Happy New Year. We hope the New Year will also witness great achievements of our organizations, at the state as well as the central levels.**

**The developments in Delhi**

As I informed you in the last Circular, I have been in Delhi for most of the time to pursue the AIFUCTO demands. I discussed with Sri R.P.Sisodia,Joint Secretary,MHRD (Higher Education) & Sri Upamanyu Basu, Secretary (Acting) & FA of UGC several times the issues of roll out of regulation from 2013-2014 and the revision of the Second Amendments to make the Regulations practicable. We have been highlighting these demands as the promotions in states are either not taking place or teachers are facing great hurdles to enjoy CAS.i pointed out that some concrete decisions must be taken in the interest of teachers**.**

**RUSA**

The HRD has issued templates for RUSA.Please send your observations & feedbacks in this regard**.**Since, RUSA is going to contribute substantially to fill up the vacant posts, and all our affiliates must keep in touch with the state governments for the planning & execution.

**IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY, NAGPUR BENCH, NAGPUR**
**WRIT PETITION NO.4221 OF 2013**

**(1)** Pravin Balisingh Raghuwanshi, Aged about 44 years, Occ. Service, r/o. Buty Plot, Near Mahajanwadi, Rajapeth, Amravati 444605. **(2)** Arun Uddhavrao Pachkhede, Aged about 58 years, Occ. Service, r/o. Near Hanuman Mandir, Chhangani Nagar, Amravati 444605 ........ *PETITIONERS* **// VERSUS // (1)** Director of Higher Education, Administrative Building, Shivaji Nagar, Pune. **(2)** Joint Director of Higher Education, Amravati. **(3)** Senior Auditor (Higher Education Grants), Amravati Region, Amravati. **(4)** The Principal, Shri Brijlal Biyani Science College, Dashara Maidan Road, Amravati. ........ *RESPONDENTS*

Mr.F.T.Mirza, Adv. for the Petitioners., Mr.N.W.Sambre, G.P. for Respondent Nos. 1 to 3.,Mr.D.M.Kakani, Adv. for Respondent No.4..

**CORAM : B. R. GAVAI & Z. A. HAQ, JJ.**
**DATE : 19/10/2013.**
***ORAL JUDGMENT* (Per B. R. Gavai, J) :**

1. Rule. Rule made returnable forthwith. Heard by consent.

2. The petitioners have approached this Court challenging the order dt.30.1.2013 passed by respondent no.2, vide which the amount paid to the petitioners on account of two increments upon obtaining Ph.D. degree is sought to be recovered. The impugned order refers to the Government Resolution dt.18.3.2010.

3. The Division Bench of this Court, to which one of us was a party, vide judgment and order dt.22.8.2011 passed in Writ Petition No.9054 of 2010, has held that the said communication dt.18.3.2010 is not sustainable in law in view of the law laid down by the Apex Court in the case of ***Syed Abdul Qadir .vs. State of Bihar and Others*** reported in 2009 (3) SCC 475. The Special Leave Petition filed against the said judgment has been dismissed by the Apex Court on 9.5.2012.

4. It is not in dispute that the facts in the present case are similar to the facts in the aforesaid case. In that view of the matter, rule is made absolute in terms of prayer clause (a) of the petition. No order as to costs.

JUDGE **AF:P221** JUDGE

**Visiting MHRD & UGC websites**

We have been urging you regularly to visit UGC & MHRD websites on a regular basis as many important documents are being uploaded and all leaders must be fully aware of the developments and also to share with the national leadership their opinions, state specific issues and other relevant matters.

**Reimbursement of arrears**

So far as we have been informed by the affiliates, we have been able to expedite the payments. A number of states demands have been fully reimbursed. There are reports that some state governments have refused to pay & informed the state associations that arrears would be paid when money comes from the central govt. Please note this is not in keeping with the pay revision order. Payments will have to be made first and 80% of the payments would be reimbursed. The state leaders where the payments are not made should talk to the respective state govts. They should involve the AIFUCTO leadership for the purpose. It has already been delayed and no further delay should happen.

We welcome the new Life Members

The following retired teachers have been given Life membership at the Mangalore Conference

| | |
|---|---|
| 1.Prof.A Ravindra Charry | ACTA,Andhra Pradesh |
| 2.Prof.B.Venkatesh Rao | ACTA,Andhra Pradesh |
| 3.Prof.Mallikarjun Rao | ACTA.Andhra Pradesh |
| 4.Prof.Parimal Debnath | JUTA, West Bengal |
| 5.Prof.T.Karunanithy | TNGCTA,Tamil Nadu |
| 6.Prof.S Gunprakash | TUCTA,Karnataka |
| 7.Prof.Chandranath Baruah | ACTA,Assam |
| 8.Prof.P.Jayagandhi | AUT,Tamil Nadu |
| 9.Prof.N.C.Chandrasekhar | AUT,Tamil Nadu |

We extend a hearty welcome to all of them.Prof.Gopal Nanda of Odisha have been requested by the General Secretary to take care of the life members data base and also to help General Secretary for other matters. From this year we shall issue certificates to the new members. We have received reports that some memberships given at the Hyderabad Conference in the year 2007 are not in data base. We request such members to kindly contact the General Secretary as early as possible. The entire data base will be uploaded in our website very soon.

**Meeting of retired teachers to form AIFRUCTO**

In the Mangalore Conference, retired teachers expressed great disappointment with working of the all India retired teachers association created by the life members with active support from the AIFUCTO leadership. A decision was taken by the Life Members to convene a meeting at Chennai to form a new federation. Accordingly, a meeting is going to be held in Chennai on 16th March, 2014.

Please contact Prof.Parthasarathi, Mob-09940668270 andProf.E.P.Perumal, Mob:09443334397 (Conveners) for the details. You are requested to contact the retired teachers association of your state and help them to keep in touch with the conveners.

**The issues of deprived teachers**

The Mangalore Conference expressed solidarity with large number of teachers across the country having different nomenclatures-contractuals,part-timers, state scale teachers, private college teachers, guest teachers and so on. They have very poor payment structure and no retirement benefits.Further,in most instances they have no security of services. The Conference demanded proper pay scales and other benefits along with security of services. All AIFUCTO affiliates should organize such deprived teachers as early as possible.

**Affiliates news**

**ASSAM ACHIEVEMENT**

Assam College Teachers' Association (ACTA) has done a great achievement. The promotion of college teachers, which was kept pending by the Department of Higher Education, govt. of Assam for almost two years, is being reopened by two Office Memoranda on 13th of Nov.2013. The college teachers of Assam had to suffer tremendously during this period of time. AIFUCTO

also kept close contact with the ACTA leadership with all possible help and guidance. It is a matter of great satisfaction that the long standing problem of promotion is solved, and solved in a highly satisfactory manner. As per provisions of the said OMs all college teachers of Assam shall get promotion in the old time-scale system till the date of issuance of the OMs. After two years of continuous struggle the ACTA has achieved this milestone achievement and it has been possible only because of the united struggle of all the college teachers of Assam under the leadership of the ACTA. AIFUCTO congratulates all the college teachers of Assam in general and the ACTA leadership in particular

**BIHAR-TMBTA**

14th statutory conference of T M Bhagalpur Teachers Association held on 4th &5th Jan. 2014 at R S College. Tarapur.The Conference was inaugurated by Vice-Chancellor 0f TM B.University on 4th Jan. at 1 pm in the presence of a large number of members & leaders. The leaders included Prof. Asok Barman, General Secretary ,AIFUCTO, Prof. V P Singh ,the legendary teacher leader of Bihar,Ex-General Secretary FUTAB & Ex-National Secretary AIFUCTO, Dr Arun Kumar,National Secretary AIFUCTO,Dr Anjani Kumar, Zonal Secretary AIFUCTO, teacher MLC Dr Sanjeev Kr. Singh, Prof. D S Singh ,GS,TM Bhagalpur University Teachers Association ,Prof. Pushpendra Kumar Singh, principal of the host college the organizing secretary of the conference including galaxies of local teacher leaders and university officers. Prof Ashok Barman addressed the session. Inaugural session was presided over by Prof V P Singh.

The first business session started at 5 o'clock in the evening in which the General Secretary Prof Durga Saran Singh presented annual report and also the report of income expenditure of his term. A very good & entertaining cultural programme was presented by the local artists in the evening. On the second day delegate session started at 11 am after breakfast. About 100 delegates & observers participated in the session. 15 to 20 delegates participated in the discussion. Prof VP Singh, Dr Arun Kumar & Dr Anjani Kumar also addressed the delegate session. Both the reports were passed unanimously by delegates with many valuable suggetions.The session was presided over by Prof Balmiki Sharma, H O D of P G Department of History, TM Bhagalpur University.

Election of new office bearers was held and the new leadership was elected unanimouly.DR Mihir Mohan MIshra"Suman" and Prof Anand Kumar were elected for the post of president &secretary along with three vice-presidents, two joint secretaries, one assistant secretary, two zonal secretaries, two spokes persons, one office secretary along with eighteen members of the new executive. Before the end of the session, the conference condoled the death of Late Shiv Kumar Singh, a great leader of FUTAB & general secretary of TM Bhagalpur University Teachers Association for 19 years. The conference concluded with the singing of the national anthem

**NOTICE FOR NEC MEETING**

A meeting of NEC will be held on March 1,2014
at Gwalior at 11 A.M

**AGENDA : (1)** Confirmation of minute of the last meeting **(2)** Felicitation to the retired Office bearers of last term **(3)** Report from General Secretary **(4)** Reports from affiliates **(5)** .Future course of action.

All NEC members are requested to attend.

*We will felicitate the office bearers who retired from leadership for the current term at the Mangalore Conference before the NEC meeting begins (10 A.M)

Please note A National Conference will be held on "RASHTRIYA UCHHATAR SIKSHA ABHIYAN: A Paradigm shift for Quality Enhancement of Science & Humanities education & Research" being organized by MPFUCTA & MPGCTA on 28th February, 2014.All NEC members have been invited by the organizers.

Contact Prof.D.Kumar, Treasurer for further details. The venue will be notified in the website. (Prof.D.Kumar) Mob: Phone: 09425790814, E-mail: drdkumar65@gmail.com )

**ASOK BARMAN,** General Secretary

**N.M. GANGULI : C.R. SADASIVAN,** Advocates High Court

A/205 R.K. Gokuldham, S.V. Road, Borivli (W) Nr. Kora Kendra Bus Stop, Mumbai 400 092.

## 10TH FEBRUARY 2013 : REMINDER NOTICE

To
The Secretary
University Grants Commission
Bahadur Shah Zafar Marg
New Delhi 110 002.

Re: Contempt committed by the UGC in respect of W.P. No.10149 of 2010 before the Bombay High Court (Aurangabad Bench)

Sir:

I am concerned for my client Maharashtra Federation of University & College Teachers' Organizations (MFUCTO for brevity) through Secretary, Dr. Tapati Mukhopadhyay, in the above-mentioned Writ Petition and under instructions from my client I have to state as under:

4. My client states that in respect of the said Petition which was pending before the Bombay High Court (Aurangabad Bench) the UGC was a party-Respondent. The Petition was on the question of teachers in Maharashtra affected by the attempt of the State Government to retrospectively implement NET/SET qualification condition on them. On 11th April 2011 the UGC filed an Affidavit which was marked in the Hon'ble High Court as pages 83 to 108. In para.12 of the said Affidavit it was assertively stated as under:

"UGC's Regulations 1991 on minimum qualification are mandatory in nature."

3. My client states that the said statement was not correct and in fact against the findings of the Hon'ble Supreme Court of India in The University of Delhi, Appellant v/s. Raj Singh & Ors, Respondents (AIR-1995 SC, 356) through Hon'ble Justice A.M. Ahmadi and Hon'ble S.P. Bharucha, JJ. In view thereof MFUCTO was compelled to send legal notice to the UGC through you as its Secretary pointing out that the statement amounted to a contempt of the Hon'ble Supreme Court of India and intended to confuse the Hon'ble High Court at Bombay (Aurangabd Bench). My client states that the said legal notice sent through speed post and duly delivered upon you contained a number of documents which evidenced that the statement of the UGC to the effect of stating that the 1991 Regulations were mandatory was false. By the said legal notice, MFUCTO had called upon the UGC to put on record its unconditional apology for the averment in the said Affidavit that UGC 1991 Regulations are mandatory, within a period of 14 days failing which MFUCTO may be compelled to take out legal proceedings against the UGC for contempt of the Hon'ble Court as also for having committed perjury by making false statement on oath in the Affidavit in the said Writ Petition before the Hon'ble High Court at Bombay, (Aurangabad Bench). A copy of the legal notice (without enclosures) is attached hereto and marked as EXHIBIT A.

4. My client states that MFUCTO and/or the Advocates of the MFUCTO have not received any response from your end. Hence, this reminder notice is being sent to you for immediate response and action on your part. In case, the UGC fails to respond, MFUCTO may be compelled to take out legal proceedings against the UGC for contempt of the Hon'ble Court and also for having committed perjury by making false statement on oath in the Affidavit in the said Writ Petition before the Hon'ble High Court at Bombay, (Aurangabad Bench).

Yours faithfully
**(C.R. Sadasivan)**
Advocate High Court

Encl: Ex: A

# समाजकार्य व आयुर्वेद महाविद्यालयातून पेन्शन योजना लागू करणे

*या विषयावर सुरूवातीपासून तर शेवटपर्यंत किमान २७ वेळा विधानपरिषदेमध्ये चर्चा झाली. त्यातील काही वेळेच्या चर्चेची अधिकृत प्रतिवेदने यापूर्वीच्या अंकात प्रसृत करण्यात आलेली आहेत. क्रमांक ६ ते १४, १७ व १८ क्रमांकावरील प्रतिवेदने आज प्रसृत करण्यात येत आहेत. -* ***संपादक***

(६)

## आयुर्वेद कॉलेज मधील अध्यापक व अध्यापकेतरांना पेन्शन योजना लागू करणे विषयी

*महाराष्ट्र विधानपरिषद : : पहिले अधिवेशन, १९९२*
*मंगळवार, दिनांक ३१ मार्च १९९२*
*अधिकृत प्रतिवेदन, खंड ९५, क्रमांक ११, पृष्ठ २४*

**१७५८६ सर्वश्री. बी.टी.देशमुख, राजाभाऊ उदगीरकर, टी.एफ.पवार, सुरेश पाटील :** तारांकित प्रश्न क्रमांक १०१७० ला दि. १ जुलै १९९१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानप्राप्त आयुर्वेद महाविद्यालयातील अध्यापक व अध्यापकेतर कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती योजना लागू करण्याच्या विचाराधीन प्रश्नाबाबत शासनाचा विचार पूर्ण झालेला आहे काय;

(२) असल्यास, शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरूप काय आहे;

(३) नसल्यास याबाबत होणाऱ्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**श्रीमती पुष्पाताई हिरे :** (१) होय.

(२) राज्यातील **अनुदानप्राप्त आयुर्वेद महाविद्यालयातील अध्यापक व अध्यापकेतर कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती योजना लागू न करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.**

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

******

(७)

## आयुर्वेदिक कॉलेजमधील अध्यापक व अध्यापकेतरांना पेन्शन योजना लागू करणेविषयी

*महाराष्ट्र विधानपरिषद : : पहिले अधिवेशन, १९९३*
*शुक्रवार, दिनांक १९ मार्च १९९३*
*अधिकृत प्रतिवेदन, खंड ९८, क्रमांक ५, पृष्ठ ४९*

**२५७५३. सर्वश्री बी.टी.देशमुख, व्ही.यु.डायगव्हाणे, पी.जी.दस्तुरकर, सुरेश पाटील, टी.एफ.पवार :** तारांकित प्रश्न क्रमांक १०१७० ला दिनांक १६ जुलै, १९९१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील कायः-

(१) राज्यातील अनुदानप्राप्त आयुर्वेद महाविद्यालयातील अध्यापक व अध्यापकेतर कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती योजना लागू करण्याच्या विचाराधीन प्रश्नाबाबत शासनाचा विचार पूर्ण झालेला आहे काय;

(२) असल्यास, याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरूप काय आहे;

(३) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**श्रीमती पुष्पाताई हिरे :** (१) होय.

(२) शासनाने सदर योजना अमान्य केली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

******

(८)

## आयुर्वेद महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पेन्शन योजना लागू करण्याबाबतचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

*महाराष्ट्र विधानपरिषद : : तिसरे अधिवेशन, १९९७*
*सोमवार, १५ डिसेंबर, १९९७*
*अधिकृत प्रतिवेदन, खंड ११३, क्रमांक १, पृष्ठ ७१*

* **२२४३७. सर्वश्री व्ही.यु.डायगव्हाणे, बी.टी.देशमुख, पी.जी.दस्तुरकर, सुरेश पाटील, जयवंत ठाकरे :** सन्माननीय वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील कायः-

(१) आयुर्वेद महाविद्यालयातून काम करणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती वेतन व उपदान योजना लागू करण्यात यावी अशा प्रकारचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने १४ जून, १९९६ रोजी याचिका क्रमांक ३५०८/९२ व २६४५/९० या प्रकरणात दिला, हे खरे आहे काय;

(२) खरे असल्यास, सर्वोच्च न्यायालयामध्ये या प्रकरणात (सिव्हील अपील नंबर २८७८-७९ ऑफ १९९७) शासनाने दाखल केलेल्या अपील याचिकेवर ७ एप्रिल १९९७ रोजी निर्णय देताना मा. सर्वोच्च न्यायालयाने "सेवानिवृत्ती व उपदाने योजना अनुदानित आयुर्वेद महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू करण्याबाबत शासनाने विचार करावा" असे निर्देश दिलेत ही, गोष्ट खरी आहे काय;

(३) मोठा वित्तीय भार अंतर्भूत असला तरी या काही शिक्षकांनाच या योजनेपासून वंचित ठेवण्याचा शासनाचा हेतू नाही, असे प्रतिज्ञापत्र शासनाच्या वतीने सर्वोच्च न्यायालयामध्ये उक्त अपील याचिकेच्या संदर्भात दाखल करण्यात आले होते, हेही खरे आहे काय;

(४) असल्यास, याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरूप काय आहे;

(५) अजूनही निर्णय झालेला नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ.विजयकुमार गावित, डॉ.दौलतराव आहेर** यांचेकरिता : (१) व (२) होय. (३) नाही. (४) व (५) अनुदानित आयुर्वेदिक व युनानी महाविद्यालये व संलग्नित रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती व उपदान योजना लागू करण्यात येऊ नये असा निर्णय शासनाने घेतलेला आहे. परंतु संबंधित कर्मचारी संघटनांची सततची मागणी विचारात घेऊन शासन ह्या निर्णयाचा पूनर्विचार करीत आहे.

**श्री.बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महोदय माझा हरकतीचा मुद्दा आहे.

**सभापती :** प्रथम मा.सदस्य श्री.व्ही.यु.डायगव्हाणे यांना प्रश्न विचारू द्यावा. नंतर हरकतीचा मुद्दा उपस्थित करावा.

**श्री.व्ही.यू.डायगव्हाणे :** अध्यक्ष महोदय, मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने आयुर्वेद महाविद्यालयात काम करणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन व उपदान लागू करावे असा निर्णय दिलेला आहे. तसेच सर्वोच्च न्यायालयाने देखील शासनाने यासंबंधी विचार करावा, असे सुचविले आहे. असे असताना या प्रश्नास दिलेल्या उत्तरामध्ये म्हटले आहे की, सततची मागणी विचारात घेऊन शासन याचा पूनर्विचार करील. म्हणून दोन महिन्याच्या आत शासन याचा पूनर्विचार करणार आहे काय? आणि या कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन आणि उपदान दिले जाईल काय?

**डॉ.विजयकुमार गावित :** अध्यक्ष महोदय, सर्वोच्च न्यायालयाने सांगितले आहे व ही बाब शासनाच्या कक्षेतील आहे. हा निर्णय घेण्यासंबंधी वित्त विभाग आणि विधी व न्याय विभागाकडे अभिप्राय मागितले आहेत. ते आल्यानंतर या बाबतीत पूनर्विचार केला जाईल.

**श्री.बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महोदय, माझ्या प्रश्नाचे उत्तर दिले नाही. न्यायालयाने निर्णय दिला काय त्यास होय असे उत्तर दिले आहे पण क्रमांक तीनला नाही, असे उत्तर दिले आहे.

**सभापती :** एका प्रश्नास होय असे उत्तर आहे व दुसऱ्यास नाही असे उत्तर आहे.

**श्री.बी.टी.देशमुख :** एके ठिकाणी होय असे उत्तर दिले तर दुसऱ्या ठिकाणी नाही असे उत्तर दिले आहे. सभापती महोदय, सुप्रीम कोर्टाने आदेश दिले आहेत का? या प्रश्नाला 'होय' असे उत्तर दिलेले आहे आणि प्रतिज्ञापन शासनाच्यावतीने सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आले होते, हे खरे आहे काय, या प्रश्नाला 'नाही' असे उत्तर दिलेले आहे. प्रतिज्ञापन दिले नसेल. पण शासनाला सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिले आहेत की, याबाबत शासनाने विचार करावा. प्रतिज्ञापन हा शब्द या ठिकाणी चुकून आला आहे. पण सर्वोच्च न्यायालयाने शासनाला निर्देश दिले आहेत. सेवानिवृत्ती व उपदाने योजना अनुदानित आयुर्वेद महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू करण्याबाबत शासनाने विचार करावा असे निर्देश दिले आहेत. तेव्हा माझ्या सहकाऱ्यांनी, माननीय सदस्यांनी विचारल्याप्रमाणे दोन महिन्यात यासंबंधीचा निर्णय घ्याल का?

**डॉ.दौलतराव आहेर :** सभापती महोदय, इतर राज्यात अशा प्रकारचे निवृत्ती वेतन देण्याची कुठेही तरतूद नाही. त्याचप्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन १९८२ मधील तरतुदीनुसार सदर योजना लागू नाही) म्हणजे १९८२ मध्येच अशी योजना लागू नाही, अशी तरतूद केलेली आहे. **तरीसुद्धा यासंबंधी शासनाने सहानुभूतीने विचार करावा असा विचार केलेला आहे. आणि सदर प्रकरण वित्त विभाग आणि विधी व न्याय विभागाकडे अभिप्रायासाठी पाठविले आहे.**

**श्री.व्ही.यू.डायगव्हाणे :** सभापती महोदय, दोन महिने हा काही फारसा कमी अवधी नाही आणि हा एक छोटासा गट आहे. त्यांच्या निवृत्ती वेतनाचा प्रश्न आहे. म्हणून दोन महिन्यात यासंबंधीचा निर्णय घेतला जाईल काय?

**डॉ.दौलतराव आहेर :** सभापती महोदय, सन्माननीय सदस्य म्हणतात त्याप्रमाणे हा काही छोटासा गट नाही. **३ कोटी ७६ लाख रुपये इतका खर्च अपेक्षित आहे. त्याचप्रमाणे आम्ही सहानुभूतीने विचार करीत आहोत.** इतर राज्यात ज्या गोष्टी घडत नाहीत, त्याबाबत विचार करीत आहोत. विधी व न्याय विभागाचे मत मागितले आहे, तसेच वित्त विभागाने त्याला मंजुरी द्यायची आहे. त्यानंतर मंत्रिमंडळापुढे हा विषय येईल आणि **सुप्रीम कोर्टानेही आदेश दिलेले आहेत.**

**श्री.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, १५ हजार लोकांच्या बाबतीत महाराष्ट्रामध्ये केलेले आहे आणि हे १५०० लोकसुद्धा नाहीत. माननीय मंत्रिमहोदयांनी रक्कमही

सांगितली आहे. ती फार मोठी नाही. हे व्हायटल डिस्क्रेशन आहे. उच्च न्यायलयाने त्यांच्या बाजूने निर्णय दिलेला आहे. सुप्रीम कोर्टानेही निर्देश दिलेले आहेत. "It is not the intention of the Government to give a deferred treatment to this segment of teachers." हे सगळे कोट केलेले आहे. हायकोर्टात त्यांच्या बाजूने निर्णय लागला आहे. सुप्रीम कोर्टाने ही गोष्ट फेटाळलेली नाही, निर्णय घेण्याबाबत आपल्याकडे सुपूर्द केलेले आहे. **तेव्हा याबाबतचा निर्णय घेण्याची प्रक्रिया दोन महिन्यात पूर्ण कराल का?**

**डॉ. दौलतराव आहेर :** सभापती महोदय, सहानुभूतीने विचार करण्याची प्रक्रिया सुरू झालेली आहे, परंतु त्याचबरोबर हा निर्णय मंत्रिमंडळाने घ्यायचा आहे. इतर खात्यांचेही असे प्रश्न आहेत तेव्हा मंत्रिमंडळाने ठरविले आहे की, हे सगळे प्रश्न एकत्रितपणे मंत्रिमंडळासमोर मान्यतेसाठी आणावेत म्हणजे त्यावर साधकबाधक विचार होईल.

**सभापती :** प्रश्न वेळ संपली.

*****

## (९)
## समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना निवृत्तिवेतन उपदान योजना लागू करणेबाबत.

*महाराष्ट्र विधानपरिषद : : पहिले अधिवेशन, १९९८*
*शुक्रवार, दिनांक २४ एप्रिल १९९८*
*अधिकृत प्रतिवेदन, खंड ११४, क्रमांक ६, पृष्ठ वि.प.६ (१६)*

**(२०) २३०२५ (९-१२-९७) सर्वश्री. जयवंत ठाकरे, बी.टी.देशमुख, पी.जी.दस्तुरकर, व्ही.यू.डायगव्हाणे, सुरेश पाटील :** सन्माननीय समाजकल्याण मंत्री पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय:-

(१) राज्यातील समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना निवृत्तिवेतन व उपदान योजना लागू करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, याबाबत कोणता निर्णय घेण्यात आला आहे वा घेण्यात येत आहे?

**श्री.बबनराव घोलप (२१-२-९८) :** (१) होय.

(२) मंत्रालयातील विविध विभागांतून त्यांच्या अधिपत्याखालील अनुदानित संस्थाना निवृत्तिवेतनाची योजना लागू करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात येत असल्याचे विचारात घेऊन अशा संस्थाना निवृत्तिवेतनाची योजना लागू केल्यास शासनावर किती आर्थिक भार पडेल, इत्यादी माहिती वित्त विभागाकडे संकलित करण्यात आलेली असून, अशा संस्थाना निवृत्तिवेतनाची योजना लागू करावी किंवा कसे याबाबतचा सर्वसाधारण स्वरुपाचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या विचारार्थ वित्त विभागाकडून सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्ताव अद्याप शासनाच्या विचाराधीन आहे.

******

## (१०)
## आयुर्वेद महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पेन्शन योजना लागू करण्याबाबतचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

*महाराष्ट्र विधानपरिषद : : दुसरे अधिवेशन, १९९८*
*मंगळवार, दिनांक २१ जुलै १९९८*
*अधिकृत प्रतिवेदन, खंड ११५, क्रमांक २, पृष्ठ २५*

**२७३०१ सर्वश्री जयवंत ठाकरे, बी.टी.देशमुख, पी.जी.दस्तुरकर, सुरेश पाटील, व्ही.यू.डायगव्हाणे, दिवाकर पांडे, शालिग्राम बसैये, सुभाष दापके, सुभाष देशमुख, बळवंतराव ढोबळे, श्रीमती संजिवनी रायकर, सर्वश्री प्रकाश जावडेकर, वसंत बापट, अशोक मोडक, सर्वश्रीमती वीणा शर्मा, इंदूमती नाकाडे, श्री.व्यंकाप्पा पतकी :** तारांकित प्रश्न क्रमांक २४११२ ला दिनांक २० मार्च १९९८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुदानित आयुर्वेदीक व युनानी महाविद्यालय व संलग्न रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती व उपदान योजना लागू करण्याच्या पुनर्विचाराधीन असलेल्या मागणीबाबत शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय;

(२) असल्यास, याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे;

(३) अद्याप निर्णय झालेला नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. दौलतराव आहेर :** (१), (२) व (३) या संदर्भात शासन लवकरच निर्णय घेत आहे.

******

## (११)
## समाज कार्य महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन उपदान योजना लागू करण्याबाबत

*महाराष्ट्र विधानपरिषद : : दुसरे अधिवेशन, १९९८*
*गुरुवार, दिनांक २३ जुलै १९९८*
*अधिकृत प्रतिवेदन, खंड ११५, क्रमांक ४, पृष्ठ २०*

**२७२८३ सर्वश्री पी.जी.दस्तुरकर, सुरेश पाटील, जयवंत ठाकरे, व्ही.यु.डायगव्हाणे, किसनराव राठोड, व्यंकाप्पा पतकी :** दिनांक २४ एप्रिल, १९९८ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या सहाव्या यादीतील अतारांकित प्रश्न २३०२५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय समाजकल्याण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) राज्यातील समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षण व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन व उपदान योजना लागू करण्याच्या विचाराधीन प्रश्नावरील शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय;

(२) असल्यास, शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरूप काय आहे;

(३) अद्यापही विचार पूर्ण झालेला नसल्यास, याबाबत होण्याच्या विलंबाची कारणे काय?

**श्री. बबनराव घोलप :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) राज्य शासनाची विकासासंबंधीची बांधिलकी लक्षात घेता राज्य शासनाकडे विकासाच्या कामासाठी उपलब्ध असलेला निधी पुरेसा नसतो. राज्याच्या निम्म्याहून अधिक महसूल हा फक्त शासकीय खर्चासाठी अर्थात वेतन भत्ते, निवृत्ती वेतन व उपदान इत्यादी आस्थापनाविषयक बाबींवर खर्च केला जात आहे. हा खर्च आवर्ती स्वरूपाचा असल्यामुळे राज्य शासनाच्या तिजोरीवरील हा खर्चाचा भार सातत्याने वाढत आहे आणि कोणत्याही संस्थेस निवृत्तीवेतनाची योजना लागू करण्यापूर्वी सखोल अभ्यास करून घेणे आवश्यक आहे. त्यामुळे अद्यापि, विचार पूर्ण झालेला नाही.

******

## (१२)
## समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन उपदान योजना लागू करणेबाबत

*महाराष्ट्र विधानपरिषद : : तिसरे अधिवेशन, १९९८*
*शुक्रवार, दिनांक १८ डिसेंबर १९९८*
*अधिकृत प्रतिवेदन, खंड ११६, क्रमांक ५, पृष्ठ २६*

**३१७३७. सर्वश्री मखराम पवार, किशोर काशिकर, हुसेन दलवाई:** तारांकित प्रश्न क्रमांक २७२८३ ला दिनांक २३-७-१९९८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय समाजकल्याण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय-

(१)राज्यातील समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन व उपदान योजना लागू करण्याच्या विचाराधीन प्रश्नावरील शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय;

(२) असल्यास, त्यानुसार या प्रकरणी कोणता निर्णय घेण्यात आला आहे;

(३) या प्रकरणी अद्याप निर्णय घेण्यात आला नसल्यास याबाबत निर्णय घेण्याची सद्य:स्थिती काय आहे

**श्री. बबनराव घोलप :** (१) होय.

(२) राज्याची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता यापुढे राज्य शासनाने निवृत्तीवेतनाची योजना कोणत्याही आस्थापनेवरील तसेच अनुदानीत संस्था, मंडळे, महामंडळे इत्यादींमधील कर्मचाऱ्यांना लागू करू नये व राज्य शासनाच्या निवृत्तीवेतनाच्या दायित्वात वाढ करू नये, असा धोरणात्मक निर्णय **मंत्रिमंडळाने दिनांक ८-७-१९९८ रोजी झालेल्या बैठकीत घेतला असल्याने राज्यातील समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन उपदान योजना लागू करणे शक्य होणार नाही.**

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

******

## (१३)
## आयुर्वेद महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना पेन्शन योजना लागू करण्याबाबतचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

*महाराष्ट्र विधानपरिषद : : चौथे अधिवेशन, १९९९*
*सोमवार, दिनांक १३ डिसेंबर १९९९*
*अधिकृत प्रतिवेदन, खंड १२०, क्रमांक १, पृष्ठ ३५*

६३ **सर्वश्री प.म.पाटील, बी.टी.देशमुख, व्हि.यू.डायगव्हाणे, सुरेश पाटील, जयवंत ठाकरे, दिवाकर पांडे, श्रीमती संजीवनी रायकर, सर्वश्री सुरेश भालेराव, प्रकाश जावडेकर :** तारांकित प्रश्न क्रमांक ३११२६ ला दिनांक १७-१२-९८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय–

(१) आयुर्वेद महाविद्यालयातून काम करणाऱ्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना

सेवानिवृत्ती वेतन व उपदान योजना लागू करण्यात यावी, या प्रकरणी शासनाने दाखल केलेल्या **अपिल याचिकेवर ७ एप्रिल १९९७ रोजी मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या संदर्भात शासनाचे धोरण काय आहे;**

(२) असल्यास, ही योजना लागू करण्याच्या विचाराधीन मागणीबाबत शासनाचा अद्यापही या बाबतीत निर्णय झालेला नसल्यास याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.दिग्विजय खानविलकर** : (१) व (२) अनुदानित आयुर्वेदिक व युनानी महाविद्यालये व संलग्न रुग्णालये **यामधील कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती वेतन व उपदान योजना लागू करण्यात येऊ नये असे याबाबतचे शासनाचे धोरण आहे.**

******

## (१४)
## आयुर्वेद महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पेन्शन योजना लागू करण्याबाबतचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

*महाराष्ट्र विधानपरिषद : : पहिले अधिवेशन, २०००*
*मंगळवार, दिनांक १४ मार्च २०००*
*अधिकृत प्रतिवेदन, खंड १२१, क्रमांक २, पृष्ठ ६*

**२६५९. सर्वश्री प.म.पाटील, व्ही.यू.डायगव्हाणे, सुरेश पाटील, जयवंत ठाकरे, प्रकाश जावडेकर, श्रीमती संजीवनी रायकर, सर्वश्री बळवंतराव ढोबळे, प्रतापराव ससोनावणे, शालिग्राम बसैये, श्रीमती निशिगंधा मोगल, सर्वश्री दिवाकर पांडे, सुरेश भालेराव, सुभाष देशमुख, अशोक मोडक** : तारांकित प्रश्न क्रमांक ६३ ला दिनांक १३ डिसेंबर १९९९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:–

(१) आयुर्वेद महाविद्यालयातून काम करणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती वेतन व उपदान योजना लागू करण्यात यावी अशा प्रकारचा जो निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने १४ जून १९९६ रोजी याचिका क्रमांक ३५०८/९२ व २६४५/९० या प्रकरणात दिला व त्याच प्रकरणी सर्वोच्च न्यायालयामध्ये (सिव्हिल अपील नं. २८७८-७९ ऑफ १९९७) शासनाने दाखल केलेल्या अपील याचिकेवर ७ एप्रिल १९९७ रोजी दिलेल्या निर्णयात "**मोठा वित्तीय भार अंतर्भूत असला तरी काही शिक्षकांनाच वंचित ठेवण्याचा शासनाचा हेतू नाही या शासनाच्या भूमिकेचे महत्व लक्षात घेऊन शासनाने या प्रकरणी निर्णय घ्यावा**" असे मा. सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, ही योजना लागू करण्याच्या विचाराधीन मागणी बाबत शासनाचा विचार पूर्ण झाला, ही गोष्ट खरी आहे काय;

(३) विचार पूर्ण झालेला असल्यास, याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे;

(४) अजूनही निर्णय झालेला नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.दिग्विजय खानविलकर** : (१) होय.

(२), (३) व (४) **अनुदानित आयुर्वेदिक व युनानी महाविद्यालये व संलग्न रुग्णालये यामधील कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तिवेतन व उपदान योजना लागू करण्यात येऊ नये, असे याबाबतचे शासनाचे धोरण आहे.**

******

## (१७)
## समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती वेतन योजना लागू करणेबाबत मा. उच्च न्यायालयाचा निर्णय

*महाराष्ट्र विधानपरिषद : : तिसरे अधिवेशन, २०००*
*मंगळवार, दिनांक २८ नोव्हेंबर २०००*
*अधिकृत प्रतिवेदन, खंड १२३, क्रमांक २, पृष्ठ ६०*

**(११) * ९११८. सर्वश्री बी.टी.देशमुख, व्ही.यु.डायगव्हाणे, सुरेश पाटील, प.म.पाटील** : सन्माननीय समाजकल्याण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय-

(१) समाजकार्य महाविद्यालयातून काम करणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती वेतन व्यवस्था लागू करण्यात येणार नाही. हा शासनाचा ८.७.९८ रोजी घेतलेला निर्णय नमूद असलेले संचालक, समाजकल्याण विभाग यांचे ३१.३.९९ चे आदेश रद्दबातल ठरविणारा निर्णय मा.मुंबई उच्च न्यायालयाने रिट पिटीशन नंबर ५४६७ ऑफ १९९९ या प्रकरणात दिनांक १८ जानेवारी रोजी किंवा त्या दरम्यान दिला, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, उक्त निवाड्यामध्ये मा.उच्च न्यायालयाने शासनाला दिलेल्या आदेशाचे निश्चित स्वरुप काय आहे;

(३) उक्त निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी काय उपाययोजना करण्यात आलेली आहे;

(४) उपाययोजना केलेली नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.जयवंतराव आवळे** : (१) होय.

(२) समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना टप्प्याटप्प्याने निवृत्ती वेतन योजना लागू करण्याबाबत शासनाने विचार करावा असे आदेश मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक १८.१.२००० रोजी दिले आहेत.

(३) सदर निवृत्ती वेतन योजना टप्प्याटप्प्याने कशा प्रकारे लागू करता येईल. याबाबत कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

******

## (१८)
## अनुदानित आयुर्वेद व युनानी महाविद्यालयांना देण्यात येणारी भेदभावपूर्ण वागणूक

*महाराष्ट्र विधानपरिषद : : तिसरे अधिवेशन, २०००*
*शुक्रवार, दिनांक १ डिसेंबर २०००*
*अधिकृत प्रतिवेदन, खंड १२३, क्रमांक ५, पृष्ठ २२*

**९११७ सर्वश्री बी.टी.देशमुख, व्ही.यू.डायगव्हाणे, सुरेश पाटील, प.म.पाटील, सर्वश्रीमती संजीवनी रायकर, इंदूमती नाकाडे, सर्वश्री प्रकाश जावडेकर, अशोक मोडक, शालीग्राम बसैये, श्रीमती वीणा शर्मा, सर्वश्री दिवाकर पांडे, सुरेश भालेराव** : सन्माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय–

(१) शतप्रतिशत वेतन अनुदानावर आधारित वेतन व्यवस्था, पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशीवर आधारित नविन वेतनश्रेणीची अंमलबजावणी व सेवानिवृत्तीवेतन व्यवस्था या तीनही बाबतीत अनुदानित आयुर्वेद व युनानी महाविद्यालयांना दिली जाणारी भेदभावपूर्ण वागणूक संपुष्टात आणणारे शासन निर्णय निर्गमित करण्यात आले, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, या तिनही बाबतीत इतर अनुदानित महाविद्यालयासारखी व्यवस्था स्थापित करणारे शासन निर्णय केव्हा निर्गमित करण्यात आलेले आहेत;

(३) शासन निर्णय निर्गमित झालेले नसल्यास याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.दिग्विजय खानविलकर** : (१) व (२) अनुदानित आयुर्वेद व युनानी महाविद्यालयांना १०० टक्के वेतनाचे अनुदान देणे, सेवानिवृत्ती वेतन योजना तसेच ५ व्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करणे या बाबी शासनाच्या विचाराधीन आहेत.

(३) या प्रस्तावातील वित्तीय भार लक्षात घेऊन त्यासंबंधीचा निर्णय घ्यावयाचा आहे त्यामुळे विलंब होत आहे.

******

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **CHIEF EDITOR :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. **PUBLISHER :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. Published at NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602. PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO.** MAHBIL/2001/4448 Postal Registration No. ATI/RNP/078/2012-14 Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **: 01.03.2014**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602.**

To,.............................................................................
.............................................................................
.............................................................................
.............................................................................